GREENLAWNS HIGH SCHOOL
FINAL EXAMINATION YEAR 2018

SUBJECT : MARATHI　　　CLASS : VII
TIME : 2 HOURS　　　MARKS : 80

---

**सूचना** – १) विभाग 'अ' मधील प्रश्नांची उत्तरे उत्तरपत्रिकेत लिहा:-
२) विभाग 'ब' मधील प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत सोडलेल्या जागी लिहा:-

प्रश्न १.अ) रिकाम्या जागी योग्य शब्द भरा. (५)

१. तिने आजपर्यंत कधीच ——————————— वाचन केले नव्हते.
२. ती भारतातील ——————————— पहिली सभा होती.
३. अचानक अमृतला एक ——————————— सुचली.
४. आजपासून आमची ——————————— सुट्टी सुरु झाली.
५. त्यासाठी आपल्यात फक्त ——————————— पाहिजे.

आ) कोण-कोणास म्हणाले ते लिहा: (४)

१. ''मी पुन्हा एकदा पुस्तक वाचते."
२. ''या मुलांना गल्लीत शिरताना मी बघितलं होत."
३. ''तुम्ही दोघ किती एकसारखे आहात."
४. ''चल ये,मी तुझ्याबरोबर कुस्ती लढतो."

इ) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (५)

१. मुले कोणत्या सणाला कुठे जमली होती?
२. वैष्णवीचा वाढदिवस कधी होता?
३. जुन्या कपडयाचा ढीग पाहून आई काय म्हणाली.
४. स्त्रियांना स्वावलंबी बनवण्यासाठी कोणती संस्था रमाबाईने स्थापन केली?
५. सोनालीने किती कथा किती वेळात वाचल्या?

प्रश्न २. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (१२)

१. वैष्णवीच्या शाळेत बालदिन कसा साजरा झाला?
२. पंडिता रमाबाईने हंटर कमिशनकडे कोणती शिफारस केली?
३. सोनालीच्या घरातील सर्वांना तिच्याकडे पाहून नवल का वाटत होते?
४. अमृत व इसाब यांच्यात कोणत्या गोष्टी सारख्या होत्या?

प्रश्न ३. क) खालील प्रश्नांची एका वाक्यात उत्तरे लिहा. (३)

१. कवितेतील लेक केव्हा रुसून बसते?
२. संत तुकाराम कोणाची संगत नको म्हणतात?
३. संत जनाबाई विठ्ठलामध्ये कोणाला शोधत आहे?

ख) खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (कोणतेही दोन) (५)

१. लेक घरात असता कवयित्रीला कोणते फायदे जाणवतात?

२. संत तुकाराम ढोंगी साधूविषयी काय सांगत आहेत ते स्पष्ट करा?

३. संत जनाबाईने वात्सल्य प्रेमाची कोणती उदा. दिली आहेत ते स्पष्ट लिहा?

प्रश्न ४. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहा. (८)

१) माझा आवडता छंद  २) झाडांचे महत्त्व

३) मकरसंक्रात  ४) मला पंख असते तर... .

प्रश्न ५. खालील विषयावर पत्र लिहा. (५)

मुख्याध्यापकांना सुट्टीसाठी परवानगी मागणारे पत्र लिहा.

प्रश्न ६. खालील मुददयावंर आधारित गोष्ट लिहून पूर्ण करा व योग्य शीर्षक लिहा. (५)

मुंगी व कबुतर मैत्री— शिकारी—- कबूतरावर नेम —-शिकाऱ्याच्या पायास मुंगीने चावणे—- नेम चुकला कबुतर वाचले———- मुंगी तळयात पडणे—- कबुतराने झाडावरुन पान टाकणे——- पानावरुन मुंगी काठावर———- कबुतराचे आभार ——— तात्पर्य.

प्रश्न ७. तुमच्या कोणत्याही एका दिवसाची एक परिच्छेदभर रोजनिशी लिहा. (५)

प्रश्न ८. सूचना फलकाच्या आधारे खालील प्रश्नांची उत्तरे लिहा. (५)

नवघर ग्रामपंचायत

दि. १५ ऑगस्ट २०१७ रोजी 'स्वातंत्र्य दिनानिमित्त' 'भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात रक्तदान करणाऱ्यास पुढील एका वर्षासाठी मोफत आरोग्य तपासणीचे कार्ड दिले जाणार आहे. तरी जास्तीत जास्त नागरिकांनी रक्तदानाचे पवित्र कार्य करुन आरोग्य तपासणीच्या मोफत कार्डाचा लाभ घ्यावा.

रक्तदान शिबिराचे स्थळ:-

डॉ. राव हॉस्पिटल, नवघर,

वेळ — सकाळी १० ते ४

प्रश्न :-

१. 'स्वातंत्र्य दिनानिमित्त' कोणत्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे?

२. रक्तदान करणाऱ्याला कोणता फायदा होणार आहे?

३. रक्तदान शिबिराचे स्थळ कोठे आहे?

४. रक्तदान शिबिराची वेळ कोणती आहे?

५. पवित्र कार्य कोणते आहे?

## विभाग – ब

**सूचना:- खालील सर्व प्रश्नांची उत्तरे प्रश्नपत्रिकेत सोडलेल्या जागी लिहा.**

प्रश्न १. खालील वाक्यप्रचारांचा अर्थ लिहून वाक्यांत उपयोग करा. (६)

१. वंचित ठेवणे – अर्थ - ______

वाक्य - ______

______

२. सफल होणे – अर्थ - ______

वाक्य - ______

______

३. वरचढ असणे- अर्थ - ______

वाक्य - ______

______

४. अट घालणे – अर्थ -

वाक्य - ______

______

प्रश्न २. खालील वाक्यांतील अधोरेखांकित अव्ययांचे प्रकार लिहा. (४)

१) गुपचुप तो त्या ठिकाणी गेला - ______

२) यंदा पाऊस पडला. व पिके वर आली -

३) घरापुढे तोरणे लावली होती. - ______

४) चुप. शांतता पाळा. - ______

प्रश्न ३. च) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा. (२)

१) ओढा - ______ २) गवतफूल - ______

३) पीळदार - ४) कर्तबगार -

छ) खालील वाक्यातील अधोरेखांकित शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहून वाक्य पुन्हा लिहा. (२)

१) बिरबलने दरबारात चोराचे सर्व गुपित सांगितले.

___

२) अजय खटयाळ मुलगा आहे.

___

३) नदीचे पाणी निर्मळ होते.

___

४) पुण्याकडील जमीन भुसभुशीत आहे.

___

ज) खालील शब्दांचे लिंग बदला. (२)

१) पेशवा - ___ २) मोकळा - ___

३) शूरांगना - ___ ४) तुटका - ___

झ) खालील वाक्यांतील अधोरेखांकित शब्दांचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा. (२)

१) राज्यमार्गावर ठिकठिकाणी स्वच्छतागृह असणे आवश्यक आहे.

___

२) देवळात जोडपे पूजेला बसले होते.

___

३) आदिवासींच्या हातात भाले होते.

___

४) भाऊच्या धक्क्यावर बोट लागली होती.

___